पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १३

**सभावृत्तांत**

दिनांक - **२२/०७/२०२१** वेळ - दुपारी **२.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची **पाक्षिक** सभा **गुरुवार** दिनांक **२२/०७/२०२१** रोजी दुपारी **२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती यांचे दालनात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि. ०३ जुलै २०२० व २८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे काही सन्मा.सदस्य सभागृहात तर काही सन्मा.सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.

१. **मा.लोखंडे चंदा राजू - सभापती**
२. मा.योगिता ज्ञानेश्वर नागरगोजे
३. मा.सविता बाळकृष्ण खुळे
४. मा.राजापुरे माधवी राजेंद्र
५. मा.गायकवाड निर्मला मनोज
६. मा.गीता सुशिल मंचरकर
७. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.चारठाणकर - उपायुक्त, मा.जगताप - नगरसचिव, मा.बहाद्दरपुरे - समाज विकास अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड शहरातील महिलांना चार चाकी हलके वाहन (LMV) चालविण्याचे प्रशिक्षण देणेबाबत - मा.निर्मला गायकवाड, मा.सविता खुळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विभागातील बालवाडी व पहिली ते दहावीतील विद्यार्थ्यांना सन २०२०-२१ साठी Tab With Eductaion Cotain खरेदी करणेबाबत - मा.सविता खुळे, मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील घोषित अघोषित झोपडपट्टीमध्ये वास्तव्यास असलेल्या महिलांना २ चादल, २ कंबल, २ पिलो कव्हर, २ दरी पंजा व २ दरी बेडशिटचा पुरवठा करणेबाबत - मा.सविता खुळे, मा.माधवी राजापूरे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक २४/०६/२०२१ व ०८/०७/२०२१ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक **१२** ) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ४० विषय क्रमांक - ०१

दिनांक – २२/०७/२०२१

सुचक :- मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.सविता खुळे

संदर्भ – मा.निर्मला गायकवाड, मा.सविता खुळे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिला व बाल कल्याण योजने अंतर्गत महिलांच्या विकासासाठी व सक्षमीकरणासाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. यामध्ये महिलांना चार चाकी हलके वाहन (L.M.V) चालविण्याचे (मोटार ड्रायव्हींग) (T.R.) प्रशिक्षण देणे ही योजना वस्तीपातळीवर राबविणेस यापुर्वी ठरावान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड शहरातील महिलांना चार चाकी हलके वाहन (L.M.V.) चालविण्याचे प्रशिक्षण देण्यात यावे. तसेच यापुर्वीच्या यादीतील उर्वरित पात्र लाभार्थ्यांना प्रशिक्षण देणेस व त्याकामी प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१ विषय क्रमांक - ०२

दिनांक – २२/०७/२०२१

सुचक :- मा.सविता खुळे अनुमोदक : मा.निर्मला गायकवाड

संदर्भ – मा.सविता खुळे, मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून, झोपडपट्टीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, शहरातील जास्तीत जास्त विद्यार्थी म.न.पा. शाळेत प्रवेश घेण्यासाठी व त्यांना मोफत शिक्षण व साहित्य मिळणेसाठी तसेच म.न.पा. शाळेतील

विद्यार्थीमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या म.न.पा. शाळांची पटसंख्या वाढण्याकरीता महिला बालकल्याण समिती प्रयत्न करीत आहे. शहरातील अनेक खाजगी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मोबाईलवर ऑनलाईन पद्धतीने शिक्षण दिले जात आहे. त्याचप्रमाणे आपल्या सर्व म.न.पा. शाळेतील विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने शिक्षण देणेत येते परंतु पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये शिक्षण घेणारे बहुतेक विद्यार्थी हे गरीब परीस्थितीतून, झोपडपट्टीतून येत असतात. काही पालकांची आर्थिक परिस्थिती खूपच हालाकीची असल्याने ते त्यांच्या पाल्यास मोबाईल खरेदी करून देऊ शकत नाही. त्यामुळे सदर विद्यार्थी हा शिक्षणापासून वंचित राहत आहे. म.न.पा. शाळेतील एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहता कामा नये यासाठी म.न.पा. महिला बालकल्याण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेतील सर्व विद्यार्थ्यासाठी थेट पद्धतीने टॅब खरेदी करणेस मान्यता व सदर कामास महानगरपालिका कलम क्र.६६ अन्वये धोरण ठरवण्यास मान्यता देणेत येत आहे. तरी सदरची खरेदी थेट पद्धतीने Tab With Education Contain राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने सन २०२१-२२ ची मान्यता असलेले बालवाडी व पहिली ते दहावीचे अभ्यासक्रम टॅब सहीत केंद्रशासनाच्या PSU संस्था Broadcast Engineering Consultants India Limited (BECIL) मार्फत त्वरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदरचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत असून ठराव कायम होणेची वाट न पाहता शाळा सुरु झालेने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याची तत्परता लक्षात घेता मा.शिक्षण अधिकारी यांनी ५ वी ते १० वी करिता वरिल प्रमाणे Tab With Education Contain चा प्रस्ताव त्वरित मा.आयुक्त यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात यावा. तसेच सदरच्या प्रस्तावास वित्तीय मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२ विषय क्रमांक - ०३

दिनांक – २२/०७/२०२१

सुचक :- मा.सविता खुळे अनुमोदक : मा.माधवी राजापूरे

संदर्भ – मा.सविता खुळे, मा.माधवी राजापूरे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिला व बालकल्याण योजने अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील घोषित अघोषित झोपडपट्टीमध्ये वास्तव्यास असलेल्या सर्व महिलांना त्यांचे कुटुंबाच्या नावे असलेला फोटोपास अथवा स्वतःचे आधारकार्ड यापैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य मानून त्या आधारे रोज वापरासाठी शासन दर करातील अनु क्र.९ क प्रमाणे २ चादर व अनु क्र.८ ब प्रमाणे २ बॅरेक कंबल व अनु.क्र.५ अ प्रमाणे २ दरी पंजा व अनु क्र.३ अ प्रमाणे २ बेडशिट संच, २ पिलो कव्हर हा प्रत्येक महिलेस वरील प्रमाणे १ संच (२ चादर, २ कंबल, २ पिलो कव्हर, व २ दरी पंजा व २ दरी बेडशिट) उपलब्ध करून देणेकामी महाराष्ट्र

हातमाग सहकारी महासंघ मर्यादित, पंतनगर गार्डन व्ह्यू को- ऑप हौसिंग सोसायटी लि.शशांक २२५/५९५ पंतनगर, घाटकोपर (पूर्व) मुंबई – ४०० ०७५ यांचेकडून शासनाच्या दर करारानुसार खरेदी करून उपलब्ध करुन देणेस व त्याकामी सर्व खर्च नागरवस्ती व विकास योजना विभागाकडील २०२१-२२ या अंदाजपत्रकातील पान क्र.३१३ मधील इतर कल्याणकारी योजना मधील उपलेखाशीर्ष अनु.क्र.१४ पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील झोपडपट्टीमध्ये वास्तव्य असलेल्या महिलांना चादर, कंबळ, पंजा आणि बेडशीट व संसारोपयोगी साहित्य देणेबाबत वाढ झाल्यास ३१/०३/२०२२ अखेर पर्यंतच्या कालावधीत सदर योजना राबविणेकामी आवश्यकतेनुसार इतर लेखाशिर्षावरील अखर्चित/शिल्लक रकमे मधून रक्कम नागरवस्ती व विकास योजना विभागातील इतर कल्याणकारी योजना मधील उपलेखाशिर्ष अनु क्र.१४ पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील झोपडपट्टीमध्ये वास्तव्य असलेल्या महिलांना चादर, कंबळ, पंजा आणि बेडशीट व संसारोपयोगी साहित्य देणेबाबत वेळोवेळी प्राधान्याने वर्ग करणेस अथवा सुधारित अंदाजपत्रकात याकामी आवश्यक तरतूद उपलब्ध करून देण्यास यापुर्वी मा.महिला व बालकल्याण समिती ठराव क्र.१३ दिनांक - १५/०१/२०२१ व मा.स्थायी समिती ठराव क्र.८२९१ दिनांक - २७/०१/२०२१ नुसार मान्यता देण्यात आली आहे. सदर कामास महानगरपालिका कलम क्र.६६ अन्वये मान्यता देणेत येत आहे. त्यानुसार महिला बालकल्याण विभागामार्फत उपरोक्त संस्थेबरोबर करारनामा करणेस व त्वरित पुरवठा आदेश देणेस येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास तसेच उक्त ठरावामध्ये नमूद केल्याप्रमाणे शासन मान्य दर करारानुसार अनु.क्र.९ क प्रमाणे २ चादर व अनु क्र.८ ब प्रमाणे २ बॅरेक कंबल व अनु.क्र.५ अ प्रमाणे २ दरी पंजा, अनु.क्र.३ अ प्रमाणे ४ बेडशिट संच, ६ पिलो कव्हर सदरचा संच हा प्रत्येक महिलेस वरील प्रमाणे १ संच साहित्य वाटप करण्यासाठी लागणारी तरतूद सन २०२१-२२ च्या महिला व बालकल्याण विभागाच्या सुधारित अंदाजपत्रकामध्ये पान क्र.३१३ महिला व बालकल्याण योजना अंतर्गत उपलब्ध रक्कम व अखर्चित रक्कम या विभागाची अथवा इतर विभागामार्फत उपलब्ध अखर्चित रक्कम अथवा डिसेंबर मधील सुधारित अंदाजपत्रकामध्ये नव्याने मागणी वरून उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच याकामी ४० कोटी रक्कम मा.स्थायी समिती मार्फत उपलब्ध करून मिळावी व सदरचे साहित्य सर्व शहरातील घोषित व अघोषित झोपडपट्टीमधील सर्व महिलांना सदर साहित्याचा लाभ मिळावा तसेच आवश्यकतेनुसार याकामी निधी कमी पडल्यास वेळोवेळी निधी उपलब्ध करून मिळावा तसेच सदरची खरेदी महाराष्ट्र हातमाग सहकारी महासंघ मर्यादित, पंतनगर गार्डन व्ह्यू को-ऑप हौसिंग सोसायटी लि.शशांक २२५/५९५ पंतनगर, घाटकोपर (पूर्व) मुंबई ४०० ०७५ यांच्यामार्फत वरील साहित्याची ५० लाखापर्यंत व महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित (महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत व्यवसाय) नेरूळ (पश्चिम) नवी मुंबई - ४०० ७०६ यांच्यामार्फत वरील साहित्याची ५० लाखाची खरेदी तसेच National Cooperative Consumers Federation of India limited (NCCF) या संस्थेद्वारे वरील साहित्याची उर्वरित रकमेची खरेदी करण्यात यावी. तरी वरील वाटप करण्यात येणाऱ्या संचामध्ये १ दरीपंजा जादा वाढ करण्यात यावी हया उपसूचनेसहित सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला असून ठराव कायम होण्याची वाट न पाहता महिला व बालकल्याण विभागातील प्रशासनाने ठराव

कायम होण्याची वाट न पाहता ठरावानुसार त्वरीत कार्यवाही करावी. व सन २०२१-२२ साठी प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी मा.आयुक्त यांचेकडे पाठविणेत यावा. सदर प्रस्तावाचे वित्तीय मान्यतेसाठी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( लोखंडे चंदा राजू )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३६०/२०२१
दिनांक : २२/०७/२०२१



( **उल्हास बबनराव जगताप** )
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.